# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८० वी बैठक दिनांक ३० ऑक्टोबर २०१३

### ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ८० वी बैठक दि. ३० ऑक्टोबर २०१३ रोजी दालन क्र. ७१२ विधानभवन, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

१. मा. ना. शशिकांत शिंदे ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष

२. मा. ना. राजेंद्र मुळक ... राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष

३. इं. शि. मा. उपासे ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

१. श्री. वि. वा. राणे ... उपसचिव
(अप्पर मुख्य सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी)

२. श्री. नं. वि. पाटील ... अवर सचिव
(प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. अविनाश सुर्वे ... मुख्य अभियंता (जसं), पुणे

२. श्री. अजित मोरे ... मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ)

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८० वी बैठक दिनांक ३० ऑक्टोबर २०१३

### ठराव

**ठराव क्रमांक ८०/१**

"नियामक मंडळाच्या ७८ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही"

**ठराव क्रमांक ८०/२**

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव  कायम करण्यात येत आहेत"

**ठराव क्रमांक ८०/३**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१२-१३ च्या १७ व्या वार्षीक अहवालास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे, तसेच सदर अहवाल राज्य शासनास सादर करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ८०/४**

"ठराव करण्यात येतो की, क्षेत्रिय परिस्थितीनुसार ओतूर वाकवस्ती  को.प.बंधा-याच्या लाभक्षेत्रामध्ये खालील बाजूस असणाऱ्या नेतवड बंधा-याच्या फुगवटयाच्या (Back Water) पाण्यामुळे नदीबाजूच्या दोन्ही तिरावरील शेतक-यांनी वैयक्तिक उपसाद्वारे बहुतेक जमिनी सिंचनाखाली आणलेल्या असल्यामुळे या को.प. बंधाऱ्याची गरज उरलेली नसल्याने ओतूर वाकवस्ती को.प. बंधारा हा प्रकल्प रद्द करण्याकरिता नियामक मंडळाची तत्वत: मान्यता देण्यात येत असून तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ८०/५**

"ठराव करण्यात येतो की, लवाद प्रकरणांच्या विधी शुल्काबाबतचे महामंडळाचे परिपत्रक क्रमांक मकृखोविम./ आ.८/ (२०/२००२) / ८८४४, दि. ०४-११-२००३ रद्द करण्यांत येत असून लवाद प्रकरणे हाताळणेसाठी वकिलांना अदा करावयाच्या विधी शुल्काबाबत शासनाचे प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे".

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८० वी बैठक दिनांक ३० ऑक्टोबर २०१३

**ठराव क्रमांक ८०/६**

**"ठराव करण्यात येतो की, सिना कोळेगाव प्रकल्पाच्या परांडा उपसा सिंचन योजनेअंतर्गत कंडारी शाखा कालव्यावरील लघुवितरीका क्र. ११ (अ), ११ (ब), १२ व वितरीका क्र. २ वरील लघुवितरीका क्र. १ चे १८३१ हे. व मुगांव शाखा कालव्यावरील लघुवितरीका क्र. ७, व त्याची उप लघुवितरीका क्र. १, लघुवितरीका क्र. ८, लघुवितरीका क्र.९ व त्यावरील उप लघुवितरीका क्र. १ वरील ६७७ हे. असे एकूण २५०८ हे. क्षेत्र सिना कोळेगाव प्रकल्पाच्या जलाशया जवळ असल्याने या वितरीकांच्या कामांना लाभधारकांचा असलेला विरोध विचारात घेता या वितरण व्यवस्थेची कामे रद्द करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्रमांक ८०/७**

**"ठराव करण्यात येतो की, सन २०११-१२ चा अलग लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील महामंडळाचे सनदी लेखापाल यांनी तयार करुन दिलेले अनुपालन यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर अहवाल राज्य शासनास सादर करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्रमांक ८०/८**

**ठराव करण्यात येतो की, सातारा तालुक्यातील उरमोडी धरण जलाशयाचे नामकरण "अभय सागर" करण्यास नियामक मंडळाची तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

तद्‌नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**